**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**प्रेस नोट दिनांक १९/०३/२०१९**

चंदननगर पो. स्टे. गु.र.नं.१०७/२०१९ भा.द.वि ३७९ मधील फिर्यादी रोहीत रामखिलावन गुप्ता,वय-२६ वर्षे धंदा-मजुरी,रा.गलांडे चाळ,शुभम सोसायटी जवळ,सोपाननगर, वडगाव-शेरी,पुणे मुळगाव-मु.पो राजापुर,ता.राजापुर,जि.चित्रकुट,राज्य उत्तरप्रदेश हे पीएमटी बस मध्ये सिध्दीविनायक बस स्टॉप ते आनंदपार्क, वडगाव-शेरी येथे प्रवास करीत असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचा लाईफ कंपनीचा मोबाईल फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीने चोरुन नेला म्हणुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

चंदननगर पो. स्टे. चे वपोनि.कृष्णा इंदलकर यांनी गुन्हयाचे तपासा मध्ये दिलेल्या सुचनांवरुन सदर मोबाईलचा तपास पोना.अमित जाधव यांनी शोध घेवुन,सदर मोबाईल चोरी करणारा आरोपी नामे आदित्य ऊर्फ माया दिपक लोट,वय- १९ वर्षे रा.जगदंबा सोसायटी,बोरा क्लास जवळ,सोमनाथनगर,वडगांव-शेरी,पुणे यांस तपास पथकाचे कर्मचारी पो.हवा.पंडीत गावडे, पोना.अमोल गायकवाड, पोकॉ.गिरीष नाणेकर, सचिन कोळी यांनी त्याचा शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्यांचेकडुन आणखी चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. १०८/२०१९ भा.द.वि.क. ३७९ मधील चोरीस गेला रेडमी मोबाईल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ४, श्री. अक्कानवरू, मा. सहा पोलीस आयुक्त सो.येरवडा विभाग,पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कृष्णा इंदलकर यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोना अमित जाधव, पो हवा पंडीत गावडे, पोना अमोल गायकवाड, पो.कॉ.सचिन कोळी व गिरीष नाणेकर यांनी केलेली आहे.